महाराष्ट्र शासन - वन विभाग

# कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - 416309 महाराष्ट्र

दूरध्वनी क्रमांक - 02346 - 271212 ई-मेल - princpalkundal@gmail.com

## जाहिरनामा

**" कंत्राटी वैद्यकीय अधिकारी " म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्तीबाबत.**

**" जिल्हा निवड समिती, कुंडल "**

सांगली जिल्हयातील महासंचालक, कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल यांचे कार्यालयात **"कंत्राटी वैद्यकीय अधिकारी"** यांचे पद निव्वळ कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात १ वर्षे कालावधी करीता बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी पद (पार्ट टाईम) करीता भरावयाचे आहे. त्याकरीता महासंचालक, कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे अर्ज सादर करावेत. **अर्ज सादर करणेचा कालावधी हा दिनांक 15 सप्टेंबर 2022 ते अंतिम दिनांक 23 सप्टेंबर 2022 अखेर (सायंकाळी 5.00 वाजेपर्यत) पर्यतचा आहे.**

इच्छुक उमदेवारांनी आपले सर्व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, बी.ए.एम.एस., एमबीबीएस किंवा पदव्युत्तर/पदवीका यांचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक, पदवी/पदवीका प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक सर्व कागदपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रतीचा एक संच या विभागामध्ये जमा करण्यात यावा. नंतर प्राप्त अर्जाची छाननी झालेनंतर जेष्ठता यादी तयार करण्यात येईल. तसेच उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे. १०० रु. बॉन्डवर सोबतच्या अटी व शर्तीचे बंधपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

1. शैक्षणिक पात्रता :- एम.बी.बी.एस. /बी.ए.एम.एस.
2. मानधन अंदाजित रु. 30000/- पर्यत प्रतिमहा
3. अनुभव : प्रशिक्षण संस्थेमधील वैद्यकीय सेवेचा कमीत कमी 2 ते 3 वर्षापर्यत
4. कामकाजाची वेळ – दररोज सायंकाळी 5 .०० ते रात्री 8.०० पर्यत

सदर जाहिरनामा हा www.kundalforestacademy.gov.in या संकेतस्थळावर, जिल्हास्तरीय व स्थानिक प्रमुख शासकीय कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आलेला असून अर्ज करण्यासाठी अर्ज नमुना सोबत उपलब्ध असेल तसेच यासाठी सोबत दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आले नंतरच नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ.एस.बी. जाधव)भा.व.से.
संचालक
कुंडल विकास प्रशासन व्यवस्थापन प्रबोधिनी (वने)
कुंडल

# अटी व शर्ती

1. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकीय अधिका-यांसारखे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन, महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवाविषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.
2. सदर वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती एक वर्षाकरीता असल्याने त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.
3. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.
4. केवळ तात्पुरती व कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची (निवृत्ती वेतन) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ नूसार अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा नियम ३० सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.
5. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.
6. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.
7. कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पुर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.
   - अ. दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.
   - आ. कामामध्ये निष्काळजीपणा
   - इ. कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्ये व जबाबदा-या कटाक्षाने न पाळल्यास.
   - ई. गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे
8. वैद्यकीय अधिका-यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाहीत व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यासाठी आंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाहीत व त्यात भाग घेणार नाहीत अशा आशयाचे बंधपत्र 100/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे.
9. या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

वरील अटी व शर्ती हया मी स्वखुशीने लिहून देत आहे. त्या मला मान्य आहेत.

उमेदवार स्वाक्षरी/-

डॉ.......................................

मो.क्र.------------------------

संपूर्ण पत्ता-------------------

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन - वन विभाग

# कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - 416309 महाराष्ट्र

दूरध्वनी क्रमांक - 02346 - 271212 ई-मेल - princpalkundal@gmail.com

" कंत्राटी वैद्यकीय अधिकारी " म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्तीबाबत.

## " अर्जदाराचा विनंती अर्ज "

अर्जदाराचे संपूर्ण नाव :- ............................................................

............................................................

अर्जदाराचा पत्ता :- ............................................................

............................................................

............................................................

शैक्षणिक अर्हता :- ............................................................

बंधपत्रीत/अबंधपत्रीत :- ............................................................

शासकीय महाविदयालय :- ............................................................

वैदयकीय नोंदणी प्रमाणपत्र :- ............................................................

जन्म दिनांक :- ............................................................

आधार कार्ड क्रमांक :- ............................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ............................................................

ईमेल आयडी :- ............................................................

अनुभव –

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

अर्जासोबत – पदवीका प्रमाणपत्र, पदवीका/पदवी मार्क मेमो, प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, अनुषंगीक सर्व प्रमाणपत्र.